# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०४/२०२६ (रविवार)

## अरोली पोलीस स्टेशन येथील चोरीच्या गुन्हयातील सन २०२२ पासुन मिळुन येत नसलेल्या पाहीजे आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली :–** दिनांक ११/०८/२०२२ रोजी फिर्यादी चंद्रशेखर प्रसाद चदलवाडा, वय ४४ वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा यांनी पोलीस स्टेशन अरोली येथे तक्रार दिली की, दिनांक ०६/०८/२०२२ रोजी रात्री ०१.३० वा. ते ०१.४० वा. चे सुमारास निमखेडा येथे असलेल्या फिर्यादीचे शेतीचे उपयोगी अवजारे बनविण्याचे दुकानासमोर ठेवलेले २०० किलो लोखंडी प्लेट किंमती १४,०००/–रूपयाचा मुद्देमाल हा निमखेडा गावातीलच आरोपींनी चोरून नेला आहे. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोस्टे अरोली येथे अप. क्र. ११३/२२ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयातील पाहीजे **आरोपी नामे लकी जगदीश इनवाते, वय २३ वर्ष, रा. निमखेडा हा गुन्हा घडल्यापासुन मिळुन येत नव्हता. मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण यांच्या मदतीने तांत्रिक पुराव्यावरून सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी लकी जगदीश इनवाते, वय २३ वर्ष, रा. निमखेडा याला दिनांक १८/०४/२०२६ रोजी भिलगाव कामठी येथुन ताब्यात घेतले.**

## शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या आरोपीस केले अटक
## अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली :–** दिनांक १४/०४/२०२६ रोजी फिर्यादी मधुकर पांडुरंग डोरले, वय ५१ वर्षं, रा. तांडा यांनी पोलीस स्टेशन अरोली येथे तक्रार दिली की, आरोपी यांनी संगनमत करून वेगवेगळया गावामध्ये येवुन शेतकऱ्यांना भेटुन शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून इतर व्यापारापेक्षा धानाचे प्रति क्विंटलवर १००/–रूपये जास्त देतो असे जास्त पैशाचे प्रलोभन देवुन एकुण १८ शेतकऱ्यांची फिर्यादीची स्वत:च्या फायदया करिता अपहार करून एकुण १८ शेतकरी यांचे कडुन किलो प्रमाणे एकुण ३१ लाख ७२ हजार ८८६ रुपये थकवुन फसवणुक केली. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोस्टे अरोली येथे अप. क्र. १८१/२६ कलम ३१६(५), ३१८(२), ३३८, ३(५) भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनात सदर गुन्हयात तपासादरम्यान गोपनीय बातमीदार तसेच तांत्रिक पुराव्याच्या आधारे पोलीस पथकाने आरोपी विजय परमानंद उके वय २६ वर्ष राहणार सक्करधरा तालुका तुमसर जिल्हा भंडारा याचा शोध घेऊन त्यास सक्करदरा (घानोड), ता. तुमसर, जि. भंडारा येथुन ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हयाबाबत विचारपूस केली असता आरोपीने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १४ गुन्हे नोंद

दिनांक १८/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ८८७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे विजय रामकृष्ण सोंनुर्ले, वय ४० वर्षे, रा. गुमगाव, ह. मु. लक्ष्मी इलेक्ट्रीकल एमआयडीसी बोरी, ता. हिंगणा, जि. नागंपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे वाल्मीक देवाजी रामटेके, वय ५५ वर्ष, रा. फेगड, ता. कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे शिवाजी विश्वनाथ धनविजय, वय ५७ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे १) रामचंद्र प्रलाद मेश्राम, वय ७० वर्ष, रा. नांद, त. भिवापूर, जि. नागपूर २) संजय पंढरी वारजूरकर, वय ५२ वर्ष, रा. कारगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे छोटे प्रेमलाल टेकाम, वय २३ वर्ष, रा. सांवगी, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे अशोक पांडुरंग रामेलवार, वय ६७ वर्ष, रा. नगरधन, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे शांताराम सिताराम सोनवाने, वय ५२ वर्ष, रा. टेकाडी याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१, असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे महादेव पुंजाराम केवट, वय ४९ वर्ष, रा. अडेगाव, ता. हिंगणा याचेवर २ गुन्हे नोंद आहे. अशा १४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १४ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ४१ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १०३५० मिली देशी दारू असा एकुण ८८७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.
## एकुण १८८३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १८/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कुही, बेला, कोंढाळी यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १८८३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मौजा चापेगडी येथे **आरोपी नामे विनायक यशवंत मांढरे, वय ५५ वर्ष, रा. चापेगडी, ता. कुही** हा वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ११३८/— रूपये असा एकुण ११४३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच पोलीस स्टेशन बेला अंतर्गत मौजा बेला टावुन बाजार येथे **आरोपी नामे सुभाष गंगाधर उजवणे, वय ४८ वर्ष, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपुर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ४२०/— रूपये असा एकुण ४२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत शिवा येथे **आरोपी नामे कुलदिपसिंग ओंकारसिंग दुधानी, वय २३ वर्ष, रा. शिवा, ता. नागपुर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ३१५/— रूपये असा एकुण ३२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**